| | सांगवी पोलीस स्टेशन<br>पोलीस आयुक्तालय पिंपरीचिंचवड<br>पत्ता - साई चौक, नवी सांगवी, पुणे<br>संपर्कक्र. ८५३०३९७८३२. | |
|---|---|---|

**प्रेसनोट १७/०९/२०२४**

## सांगवी पोलीस स्टेशन ची कामगिरी

### सांगवी भागात गांजा विक्रीसाठी आलेल्या आरोपीस सांगवी पोलीसांकडुन अटक आरोपीकडुन ३ किलो २२० ग्रॅम गांजा, मोबाईल फोन व बँक स्कॅनर जप्त

---

दि. १५/०९/२०२४ रोजी सांगवी पोलीस स्टेशन कडील अधिकारी व अंमलदार हे जबरी चोरी अनुषंगाने पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मिडोरी टॉवर समोर, विशालनगर पिंपळे निलख पुणे येथे पाठीवर सॅक असलेला एक इसम पोलीसांना पाहुन पळुन जावु लागला लागलीच त्यास पाठलाग करुन पोलीस अंमलदार यांनी शिताफीने पकडले. त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने बसिस्ट जरभान साहु, वय ३८ वर्षे, रा. मिडोरी टॉवर लेबर कॅम्प, विशालनगर, पिंपळे निलख पुणे. मुळ गाव – कुंदाबुटला, चुलीफुनका, जिल्हा बालांगीर, राज्य - उडीसा असे असल्याचे सांगितले त्याचे पाठीवर असलेले सॅकची झडती घेतली असता त्याचे ताब्यात ०३ किलो २२० ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आला असुन त्याचेकडुन एक मोबाईल फोन व एक बँकेचा स्कॅनर असा एकुण १,६०,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपी याने सदर गांजा विक्रीसाठी आणला असल्याचे त्याने सांगितले. सदर आरोपीस ताब्यात घेवुन त्याचेवर सांगवी पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. ३८३/२०२४, एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(अ) अन्वये गुन्हा दाखल आहे . आरोपीची दि. १९/०९/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर असुन पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, मा. सह पोलीस आयुक्त श्री. शशिकांत महावरकर, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, मा. पोलीस उपआयुक्त परिमंडळ १ श्रीमती स्वप्ना गोरे, मा. सहा.पोलीस आयुक्त पिंपरी विभाग श्री. सचिन हिरे, यांचे मार्गदर्शनाखाली सांगवी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री महेश बनसोडे, सहा.पोलीस निरीक्षक कलकुटगे, पोलीस उप निरीक्षक भालेराव, पोलीस उप निरीक्षक ताकभाते (तपासपथक), सहा.पोलीस फौजदार वाघुले, पोहवा १००२ ढवळे, पोहवा १११० सुपे, पो.कॉ. २८४६ खडकउमरगे, पो.कॉ. ३५१६ कामले यांचे पथकाने केली.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप- आयुक्त परि-१
पोलीस आयुक्तालय,पिंपरी चिंचवड